'सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा 2017'

# A

'25 जून 2017'

CODE : JO9

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

प्रश्नपुस्तिका

पेपर II

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग/मंत्रालय येथे चालणाऱ्या कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पद्धती

एकूण प्रश्न : 100

वेळ : 1 (एक) तास

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

↑ केंद्राची संकेताक्षरे    ↑ शेवटचा अंक

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **मंत्रालयातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग "अ" आणि विभाग "ब" सोडविणे आवश्यक आहे. आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग "अ" आणि विभाग "क" सोडविणे आवश्यक आहे.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग - अ

1. खालील विधाने विचारात घ्या -
   (a) माणसांचा अपव्यापार व वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे.
   (b) सार्वजनिक प्रयोजनाकरिता सेवा करण्याची सक्ती शासन करू शकते.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) दोन्ही विधाने चुकीचे आहेत.
   (2) विधान (a) बरोबर असून विधान (b) चुकीचे आहे.
   (3) विधान (a) चुकीचे असून विधान (b) बरोबर आहे.
   (4) दोन्ही विधाने बरोबर आहेत.

---

2. खालील विधानांवर विचार करा :
   (a) शांततेने व विनाशस्त्र एकत्र येण्याचा अधिकार सर्व नागरिकांना आहे.
   (b) शीख धर्मीय नागरिक कृपाणे स्वत:बरोबर बाळगू शकतात.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) विधान (a) बरोबर असून विधान (b) चुकीचे आहे.
   (2) दोन्ही विधाने चुकीची आहेत.
   (3) दोन्ही विधाने बरोबर आहेत.
   (4) विधान (a) चुकीचे असून विधान (b) बरोबर आहे.

---

3. राज्यघटनेने :
   (a) धर्म, वंश, जात, लिंग या कारणावरून नागरिकांमध्ये भेदभाव करण्यास मनाई केली आहे.
   (b) स्त्रिया, बालके यांच्याकरिता विशेष तरतूद करण्याची मूभा राज्यघटनेने शासनाला दिली आहे.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) दोन्ही विधाने बरोबर आहेत.
   (2) विधान (a) बरोबर असून विधान (b) चुकीचे आहे.
   (3) दोन्ही विधाने चुकीची आहेत.
   (4) विधान (b) बरोबर असून विधान (a) चुकीचे आहे.

---

4. राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे अनुच्छेद ________ नुसार राष्ट्रीय महत्वाची स्मारके व स्थाने आणि वस्तू यांचे संरक्षण करणे ही राज्याची जबाबदारी असेल.
   (1) 50 (2) 51 (3) 49 (4) 48

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

5. 'राज्यधोरणाची निदेशक तत्त्वे' या संदर्भातील खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(a) शासनाने राज्यधोरणाची निदेशक तत्त्वाचे पालन न केल्यास त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही.

(b) निदेशक तत्त्वे ही शासनव्यवहार करताना मार्गदर्शक म्हणून वापरणे अपेक्षित आहे.

(c) लोककल्याणाच्या संवर्धनासाठी समाजव्यवस्था प्रस्थापित करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व (2) (a) व (c) (3) फक्त (a) (4) एकही नाही

---

6. मूलभूत अधिकार अनुच्छेद 18 नुसार –

(a) भारताचा कोणताही नागरिक कोणत्याही परकीय देशाकडून किताब स्विकारणार नाही.

(b) सेवाविषयक व विद्याविषयक असलेला असा कोणताही किताब राज्याकडून प्रदान केला जाणार नाही.

वरील वाक्यांसाठी खालील पर्याय निवडा :

(1) दोन्ही वाक्ये चुकीची आहेत. (2) दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

(3) केवळ पहिले वाक्य बरोबर आहे. (4) केवळ दुसरे वाक्य बरोबर आहे.

---

7. मूलभूत हक्क अनुच्छेद 29 नुसार –

(a) भारतातील कोणत्याही नागरिकास आपली भाषा, लिपी वा संस्कृती जतन करण्याचा हक्क आहे.

(b) सार्वजनिक प्रयोजनाकरिता सेवा करावयास लावताना केवळ धर्म, वंश, जात वा वर्ग या कारणावरून कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

वरील वाक्यांसाठी पुढील पर्याय निवडा –

(1) वरील दोन्ही वाक्ये अनुच्छेद क्र. 29 शी संबंधित आहेत.

(2) वरील केवळ पहिले वाक्य अनुच्छेद क्र. 29 शी संबंधित आहे.

(3) वरील दोन्ही वाक्ये अनुच्छेद क्र. 29 शी संबंधित नाहीत.

(4) वरील सर्व पर्याय चुकीचे आहेत.

---

8. राज्य या शब्दात राज्यांपैकी प्रत्येक राज्याचे शासन यासोबत कशाचा समावेश होतो?

(1) विधानसभा (2) विधानपरिषद (3) मंत्रालय (4) विधानमंडळ

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

9. मूलभूत हक्क अनुच्छेद __________ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील सर्व बालकांना कायद्याने ठरविल्यानुसार शिक्षण देण्यात येते.

(1) अनुच्छेद 21 अ (2) अनुच्छेद 22 क (3) अनुच्छेद 21 (4) अनुच्छेद 22

---

10. संविधानाच्या अनुच्छेद 16 नुसार राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवायोजन किंवा नियुक्तिंच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांना समान संधी असली तरी या अनुच्छेदातील कोणत्या खंडाद्वारे कोणत्याही मागासवर्गाकरिता नियुक्त्या किंवा पदे राखून ठेवण्याची तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध नाही ?

(1) खंड 2 (2) खंड 3 (3) खंड 4 (4) खंड 5

---

11. संविधानाच्या तिसऱ्या भागात कशाबद्दल तरतूदी आहेत ?

(a) मूलभूत हक्क (b) मूलभूत कर्तव्य

(c) राज्य धोरणाची निदेशक तत्त्वे (d) नागरिकत्व

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b) (2) (a) व (b) (3) यापैकी काहीही नाही (4) केवळ (a)

---

12. प्रतिबंधक स्थानबद्धतेची तरतूद कोणत्या कलमात आहे ?

(a) कलम 21 (b) कलम 18 (c) कलम 19 (d) यापैकी काहीही नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) व (c) (3) (c) (4) (d)

---

13. सर्वसाधारण गुन्ह्यासाठी अटक केलेल्या व्यक्तिस किती कालावधीच्या आत दंडाधिकाऱ्यापुढे हजर करणे आवश्यक आहे ?

(1) आठ दिवसात (2) एक महिन्यामध्ये (3) एक आठवडा (4) चोवीस तास

---

14. राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे __________ नुसार राज्य हे कायद्याची यंत्रणा राबवताना समान संधीच्या तत्त्वावर न्यायाची अभिवृद्धी होईल याची निश्चिती करील आणि विशेषत: आर्थिक किंवा अन्य नि:समर्थतांमुळे कोणत्याही नागरिकाला न्याय मिळवण्याची संधी नाकारली जाणार नाही.

(1) अनुच्छेद 39 (2) अनुच्छेद 39 क (3) अनुच्छेद 38 (4) अनुच्छेद 38 क

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**15.** खालीलपैकी योग्य जोडी ओळखा –

(1) *कायदेविषयक मोफत सहाय्य* – *मूलभूत अधिकार*

(2) ग्रामपंचायतीचे संघटन – राज्यधोरणाची निदेशक तत्त्वे

(3) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा यांचे संवर्धन – मूलभूत कर्तव्ये

(4) मानवतावादाचा विकास – राज्यधोरणाची निदेशक तत्त्वे

---

**16.** कोणताही पेशा आचरण्याकरिता तंत्रविषयक अहर्ता ठरविण्यास राज्यास निर्बंध असणार नाही याबाबत कोणत्या कलमात तरतूद आहे ?

(a) कलम 17 (b) कलम 18 (c) (a) व (b) (d) यापैकी नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

---

**17.** खालीलपैकी कोणता मूलभूत हक्क नाही ?

(1) स्वातंत्र्याचा हक्क (2) संपत्तीचा हक्क

(3) समानतेचा हक्क (4) धर्मस्वातंत्र्याचा हक्क

---

**18.** खालीलपैकी कोणत्या बाबींचा समावेश मूलभूत कर्तव्यामध्ये होत नाही ?

(a) देशाचे संरक्षण करणे. (b) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन बाळगणे.

(c) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे. (d) राष्ट्रीय स्मारके व स्थाने यांचे संरक्षण.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व (2) एकही नाही (3) (a), (b), (c) (4) (d)

---

**19.** योग्य पर्याय निवडून पुढील वाक्य पूर्ण करा :

राज्याच्या नियंत्रणाखालील लाभाचे पद धारण करणारी व्यक्ती ________.

(1) परकीय देशाकडून कोणतीही भेट स्वीकारु शकत नाही.

(2) ती राहत असेल त्या राज्याच्या राज्यपालांच्या संमतीने परकीय देशाकडून भेट स्वीकारु शकते.

(3) राष्ट्रपतींच्या संमतीने परकीय देशाकडून भेट स्वीकारु शकते.

(4) स्वतंत्र नागरिक म्हणून स्वतःच्या मर्जीने परकीय देशाकडून भेट स्वीकारु शकते.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

20. राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे अनुच्छेद 39 नुसार -

(a) उपजीविकेचे पुरेसे साधन मिळण्याचा हक्क स्त्री-पुरुष नागरिकांना सारखाच असावा.

(b) सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता असावी.

या वाक्यांकरिता खालील पर्याय निवडा -

(1) वरील दोन्ही वाक्ये बरोबर आहेत.

(2) वरील केवळ पहिले वाक्य बरोबर आहे.

(3) वरील केवळ दुसरे वाक्य बरोबर आहे.

(4) वरील दोन्ही वाक्ये चुकीची आहेत.

---

21. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्याबाबतच्या तरतुदींचा समावेश संविधानाच्या कोणत्या घटनादुरुस्तीद्वारे केला गेला आहे ?

(1) 32 व्या (2) 44 व्या (3) 42 व्या (4) यापैकी नाही

---

22. सहा वर्षांपेक्षा लहान बालकांच्या देखभाल व शिक्षणासाठी संविधानाच्या कोणत्या भागात तरतूदी आहेत ?

(a) मूलभूत हक्क (b) राज्य धोरणांची निदेशक तत्त्वे

(c) मूलभूत कर्तव्य (d) यापैकी नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) (2) (a), (b) व (c) (3) (b) (4) (d)

---

23. कोणत्याही आरोपीस स्वत:विरुद्ध साक्षीदार होण्याची सक्ती करण्यास मनाई संविधानाच्या कोणत्या कलमानुसार आहे ?

(a) कलम 17 (b) कलम 20 (c) कलम 22 (d) यापैकी नाही

**पर्यायी उत्तरे :**

(1) (b) (2) (c) (3) (a) व (b) (4) (d)

---

24. मूलभूत कर्तव्ये घटनेच्या कोणत्या भागात समाविष्ट करण्यात आली आहेत ?

(1) भाग - 1 (2) भाग - 2 (3) भाग - 4 (4) भाग - 4 (क)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

25. पुढील जोड्या जुळवा :

| I तरतूदी | | II अनुच्छेद | |
|---|---|---|---|
| (a) | कामाचा, शिक्षणाचा आणि विवक्षित बाबतीत लोकसहाय्याचा हक्क | (i) | अनुच्छेद 39 |
| (b) | कामाबाबत न्याय्य व मानवीय परिस्थिती आणि प्रसूतिविषयक सहाय्य यांची तरतूद | (ii) | अनुच्छेद 43 |
| (c) | कामगारांना निर्वाह वेतन, इत्यादी | (iii) | अनुच्छेद 41 |
| (d) | राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची विवक्षित तत्त्वे | (iv) | अनुच्छेद 42 |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

---

26. औद्योगिकेतर संघटनेच्या एकूण सदस्य संख्येच्या किती सदस्यांनी मागणी केल्यास सर्वसाधारण सभा बोलविता येते ?

(1) 1/2 (2) 1/3 (3) 1/4 (4) 1/5

---

27. शासकीय कर्मचारी विहित प्राधिकरणाला कळविल्याखेरीज __________ करणार नाही. खालील व्यवहाराबाबत उचित उत्तर द्या.

(a) स्थावर मालमत्ता स्वत:च्या नांवाने खरेदी.

(b) कुटुंबियाच्या नांवाने असलेली मालमत्ता विक्री.

(c) स्वत:च्या नांवाने भाडे पट्ट्यावर स्थावर मालमत्ता संपादित.

(d) कुटुंबियाच्या नांवाने गहाणाद्वारे स्थावर मालमत्ता संपादित.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व बरोबर (2) सर्व चूक

(3) वरील (a), (c), (d) बरोबर (4) वरील फक्त (b) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

28. प्रत्येक शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्याने शासकीय कामकाज करतेवेळी काय केले पाहिजे ?

(1) नितांत सचोटी राखावी

(2) कर्तव्यपरायणता ठेवावी

(3) शासकीय अधिकारी/कर्मचारी याला अशोभनीय ठरेल अशी कोणतीही गोष्ट करता कामा नये

(4) वरील सर्व

---

29. म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 तील नियमांचा अर्थ लावणे या संदर्भात प्रश्न उपस्थित झाल्यास त्यावरील अंतिम निर्णय कोणाचा राहील ?

(1) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण (MAT) (2) मा. राज्यपाल

(3) मा. उच्च न्यायालय (4) शासन

---

30. श्री. देशपांडे यांनी शासनाच्या योजनेची अंमलबजावणी करताना केलेल्या कार्यवाहीबाबत त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात माध्यमांकडून टीका करण्यात आली. अशा परिस्थितीत श्री. देशपांडे यांनी मनासे (वर्तणूक) नियम 1979 अन्वये पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(1) मॅटमध्ये याचिका दाखल करावी.

(2) केलेल्या कार्यवाहीच्या समर्थनार्थ वृत्तपत्रात खुलासा करावा.

(3) त्यांच्या कृती प्रतिसमर्थनार्थ आपला अहवाल विभागप्रमुखांना सादर करावा.

(4) उच्च न्यायालयात याचिका दाखल करून त्याबाबत शासनास कळवावे.

---

31. प्रथम नियुक्तिच्यावेळी शासकीय कर्मचाऱ्याने मत्ता व दायित्व विवरणपत्र सादर करणे आवश्यक असल्याची तरतूद म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 च्या कोणत्या नियमाखाली केलेली आहे ?

(1) नियम 18 (2) नियम 19 (3) नियम 20 (4) यापैकी नाही

---

32. शासकीय कर्मचाऱ्याने धारण केलेल्या न्यायिक व कार्यकारी पदामुळे कोणत्याही स्वरूपातील खाजगी प्रकरणामध्ये तो __________ म्हणून काम करू शकत नाही.

(1) सहाय्यक (2) सरकारी अभियोक्ता (3) न्यायाधीश (4) लवाद

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

33. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनेच्या 'संघटना नियमांना' कोणाच्या मान्यतेची आवश्यकता असते ?

(1) संबंधित प्राधिकरण (2) उच्च न्यायालय

(3) संबंधित विभाग (4) शासन

---

34. श्री. पाटील हे शासकीय कर्मचारी आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीमधील खालीलपैकी कोणती कृती श्री. पाटील यांनी नियमांचे उल्लंघन न केल्याचे दर्शविते ?

(1) निवडणुकीसाठी उमेदवाराच्या नावासाठी अनुमोदन दिले.

(2) स्वत:च्या वाहनावर निवडणूक चिन्ह लावले.

(3) त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या कर्तव्याचे योग्यरित्या पालन करताना निवडणुकीचे कामकाज चालविण्यास सहाय्य केले.

(4) उमेदवाराच्या प्रचारांतर्गत निवडणूक चिन्ह असलेली टोपी वापरली.

---

35. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम 1979 मधील नियम ________ अन्वये कामकरी महिलांच्या लैंगिक छळवादास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

(1) 21 (2) 22 (3) 22 अ (4) 22 क

---

36. म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार पुढीलपैकी कोणती बाब सचोटी व कर्तव्यपरायणतेमधील उणीव मानली जाईल ?

(a) वरिष्ठ अधिकारी मौखिक आदेशाची लेखी पुष्टी देतील.

(b) शासकीय कर्मचाऱ्यांच्या कामाचा कमी दर्जा

(c) वरिष्ठांच्या मौखिक आदेशानुसारच फक्त काम करणे.

(d) सत्य व अचूक गोष्टीच करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (b) (2) फक्त (b) (3) (b) व (c) (4) (b), (c) व (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

37. (a) श्री. पाटील यांच्या एकत्रित कुटुंबामध्ये त्यांच्या छोट्या भावाने त्याच्या स्वमिळकतीने 5 एकर शेती स्वत:च्या नावाने खरेदी केली.

(b) तसेच श्री. पाटील यांच्या पत्नीला स्त्रीधन म्हणून 25 तोळे सोने मिळाले.

म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार श्री. पाटील यांनी कोणती कार्यवाही करणे आवश्यक आहे?

(1) शासनास कळविले पाहिजे
(2) शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही
(3) शासनाची कार्योत्तर मंजूरी घ्यावी
(4) यापैकी नाही

---

38. कोणताही शासकीय कर्मचारी म.ना.से. (वर्तणूक) नियमानुसार -

(a) वारंवार शेअर्स खरेदी करणे हा सट्टा होत असल्याने काहीवेळा शेअर्समध्ये पैसे गुंतवू शकतो.

(b) त्यांच्या बँकेतील पगाराच्या खात्यावरील नेहमीचे व्यवहार पत्नीमार्फत करू शकतो.

(c) स्वत:च्या घरातील खाजगी नोकराला सणानिमित्त अग्रीम वेतन देऊ शकतो.

(d) खाजगी मित्राकडून तात्पुरत्या स्वरूपात कमी व्याजाने कर्ज घेऊ शकतो.

वरीलपैकी योग्य विधाने कोणती?

(1) (b) व (c)
(2) (a) व (d)
(3) फक्त (d)
(4) सर्वच

---

39. म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार शासकीय कर्मचाऱ्यास राजकारणाविषयक पुढीलपैकी कोणते काम करता येणार नाही?

(a) स्वत:चे नाव मतदारयादीत नसलेल्या मतदारसंघात नातेवाईकाच्या उमेदवारीचा प्रचार करता येईल.

(b) राजकीय चळवळीसाठी प्रचार न करता वर्गणी मात्र देता येईल.

(c) निवडणुकीत स्वत: भाग न घेता दुसऱ्या उमेदवारास अनुमोदन देता येईल.

(d) निवडणूक कार्यक्रमांतर्गत सोपविलेली जबाबदारी पार पाडता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (c)
(2) फक्त (d)
(3) (a) व (c)
(4) (a), (b) व (c)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

40. म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार शासकीय कर्मचाऱ्यास पुढीलपैकी कोणत्या व्यवहारप्रकरणी शासनाची पूर्वमंजूरी आवश्यक आहे ?

(a) कार्यालयीन व्यवहार करणाऱ्या व्यक्तिबरोबरचा व्यवहार.

(b) प्रसिद्ध व्यापाऱ्यामार्फत केलेला व्यवहार.

(c) स्त्रिधनातून पत्नीने केलेला व्यवहार.

(d) वारसा हक्काने प्राप्त उत्पन्नातून केलेला व्यवहार.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) व (b) (4) (c) व (d)

---

41. शासकीय कर्मचाऱ्यांच्या मान्यताप्राप्त संघटनेचा पदाधिकारी म्हणून खालीलपैकी कोणाची नियुक्ती केली जात नाही ?

(1) सेवानिवृत्त व्यक्ती (2) अन्य संघटनेचा सदस्य असलेली व्यक्ती

(3) संघटनेचा सदस्य (4) यापैकी नाही

---

42. खालील विधान वाचा व उत्तर द्या -

एखाद्या शासकीय कर्मचाऱ्याला त्याच्या पदाच्या नात्याने किंवा त्याच्यावर सोपविलेल्या कर्तव्याच्या योग्य अशा पालनाच्यावेळी त्यास एखादे विधान किंवा मत व्यक्त करता येईल व त्यास प्रतिबंध असणार नाही.

(1) विधान अंशत: बरोबर आहे. (2) विधान अंशत: चूक आहे.

(3) विधान बरोबर आहे. (4) विधान संदिग्ध आहे.

---

43. म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 ची निर्मिती भारतीय संविधानाच्या कोणत्या अनुच्छेदाच्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारानुसार झालेली आहे ?

(1) 309 (2) 903 (3) 15 (4) 14

---

44. (a) कोणताही शासकीय कर्मचारी शासनाच्या पूर्वसंमतीने साक्ष देताना शासनाच्या किंवा अन्य कोणत्याही राज्यातील शासनाच्या धोरणावर अथवा कृतीवर टिका करू शकत नाही.

(b) शासनाने किंवा कोणत्याही राज्य विधानमंडळाने नियुक्त केलेल्या प्राधिकरणाच्या तसेच न्यायिक चौकशीच्या वेळी शासकीय कर्मचाऱ्याने शासनाची पूर्वमंजूरी घेऊन साक्ष द्यावयाची आहे.

उपरोक्त नमूद विधानांमधील कोणते विधान म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 च्या नियमांशी विसंगत आहे ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) व (b) (4) यापैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**45.** म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार शासकीय कर्मचारी –

(a) शासन परवानगीने अराजकीय स्वरूपाचे नियतकालिकामध्ये वृत्तपत्र व्यवस्थापन करू शकतो.

(b) टोपननावाने वृत्तपत्रात लेख छापू शकतो.

(c) केवळ साहित्यिक स्वरूपाचे लेखन शासनमान्यतेशिवाय करू शकतो.

(d) अन्य व्यक्तिच्या नावाने दूरदर्शनवर भाषण करू शकतो.

यापैकी **बरोबर** विधाने कोणते ?

(1) (b) व (c) (2) (b) व (d) (3) (a) व (d) (4) (a) व (c)

---

**46.** म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 अन्वये शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबात खालीलपैकी कोणाचा समावेश होतो ?

(1) घटस्फोटित पत्नी/पतीचा मुलगा (2) त्याच्यावर अवलंबून असणारे वृद्ध आई-वडील

(3) विभक्त झालेल्या पती/पत्नी (4) विभक्त झालेल्या पती/पत्नीचे आई-वडील

---

**47.** शासकीय कर्मचाऱ्याच्या कृतीचे व चारित्र्याचे प्रति समर्थन करण्याच्या प्रस्तावाला मंजूरी देताना शासनाकडून पुढीलपैकी कोणत्या बाबींची छाननी केली जाते ?

(a) कार्यवाहीचा खर्च संबंधित कर्मचारी करणार आहे किंवा कसे.

(b) कार्यवाहीचा खर्च शासनाने सोसावयाचा आहे किंवा कसे.

(c) संबंधित कर्मचाऱ्याने स्वखर्चाने सुरू केलेल्या कार्यवाहीचा निवाडा कर्मचाऱ्याच्या बाजूने झाल्यास न्यायालयाने दिलेल्या निवाड्यानुसार दिलेल्या खर्चाची रक्कम अथवा त्याने केलेल्या संपूर्ण खर्चाची किंवा त्याच्या भागाची प्रतिपूर्ती करणार आहे/नाही.

(d) शासनाने कार्यवाहीचा खर्च करण्याचा निर्णय घेतल्यानंतर कर्मचाऱ्याच्या बाजूने निकाल लागल्यास न्यायालयाने निवाडा म्हणून दिलेल्या नुकसान भरपाईच्या/खर्चाच्या रक्कमेतून शासनाने केलेला खर्च प्रथम वजा करील आणि शिल्लक रक्कम शासकीय कर्मचाऱ्याकडे सुपुर्द केली जाईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) व (d) (2) (a) व (b) (3) (b), (c) व (d) (4) (c) व (d)

---

**48.** म.ना.से. (वर्तणूक) नियम 1979 नुसार देणगीसंदर्भात प्रतिबंधित असलेल्या बाबी कोणत्या ?

(a) गट '**ब**' चा कर्मचारी विवाहप्रसंगी नातेवाईकांकडून ₹ 15,000 ची देणगी शासनास न कळविता स्विकारेल.

(b) शासकीय कर्मचारी क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयाची पाहणी करतांना त्यांनी दिलेले भोजन स्विकारेल.

(c) कर्मचारी सुट्टीत गावी जाण्यासाठी खाजगी मित्राने दिलेली गाडी वापरेल.

(d) नागपूर अधिवेशनकाळात क्षेत्रीय कार्यालयाकडून निवासव्यवस्था करून घेईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) (2) (a), (b) व (c) (3) फक्त (a) (4) (b) व (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

49. खालील बाबी देणगीमध्ये मोडत नाहीत.

(1) शासकीय कर्मचाऱ्याशी कार्यालयीन व्यवहार करणाऱ्या जवळच्या नातेवाईकाने दिलेली वाहतूक व भोजन व्यवस्था.

(2) शासकीय कर्मचाऱ्याचा खाजगी मित्र ज्याने कधीच कार्यालयीन व्यवहार केला नाही त्यांनी पुरवलेली विनामूल्य निवास व्यवस्था व इतर सेवा.

(3) शासकीय व्यवहार करणारा व्यक्ती किंवा कंपनीद्वारे केलेला पाहुणचार.

(4) वरील सर्व.

---

50. खालील विधान वाचा व उत्तर द्या –

अंमलात असणाऱ्या कोणत्याही कायद्याने जर संप करण्यास परवानगी दिली असली तरी शासकीय कर्मचाऱ्याला संपात सहभागी होण्यास मज्जाव करता येईल.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील विधान पूर्णत: चूक आहे. (2) वरील विधान अंशत: चूक आहे.

(3) वरील विधान बरोबर आहे. (4) यापैकी नाही.

---

51. इंग्रजी, हिंदी व मराठीत स्वाक्षरी करण्याइतपत साक्षर नसलेल्या कर्मचाऱ्याच्या प्रकरणी खालीलपैकी कोणते विधान **योग्य** आहे ?

(1) त्याच्या निरक्षरतेबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सेवापुस्तकात चिकटवावे.

(2) वेगवेगळ्या चिठ्ठ्यांवर त्याच्या बोटांचे ठसे घेऊन ते सेवापुस्तकात चिकटवावेत, म्हणजे सेवापुस्तकावर शाईचे डाग पसरणार नाहीत.

(3) सेवा पुस्तकाच्या प्रारंभिक पृष्ठावरच त्याच्या बोटांचे ठसे घ्यावेत.

(4) बोटांचे ठसे न घेता, त्याच्या शरीरावरील जन्मखुणा फक्त वैयक्तिक ओळखचिन्हे या स्तंभामध्ये लिहाव्यात.

---

52. प्रवास भत्त्यांमध्ये वाहनांच्या देखभालीसाठी दिलेल्या भत्त्यांचा समावेश होतो. हे विधान –

(1) चूक आहे (2) बरोबर आहे (3) अंशत: चूक आहे (4) अंशत: बरोबर आहे

---

53. सेवा पुस्तकांच्या वार्षिक पडताळणीसंदर्भात खालीलपैकी कोणता पर्याय **योग्य** आहे ?

(1) सेवा पुस्तक पडताळणी सप्ताहामध्ये वेतन पडताळणी पथकाकडून वार्षिक पडताळणी केली जाते.

(2) वेतनवाढ मंजूर करतानाच, पुढे होणाऱ्या चुका टाळण्यासाठी कार्यालय प्रमुख पडताळणी करतो.

(3) प्रत्येक वर्षाच्या एप्रिल महिन्यात विभाग प्रमुख पडताळणी करतो.

(4) प्रत्येक वर्षाच्या मे महिन्यात कार्यालय प्रमुख पडताळणी करतो.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

54. रोगट परिस्थिती असलेल्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना मंजूर केलेला भत्ता म्हणजे –

(1) रोगट हवामान भत्ता
(2) विशेष भत्ता
(3) वैद्यकीय भत्ता
(4) स्थानिक भत्ता

---

55. खालीलपैकी कोणती सेवा निवृत्ती वेतनार्ह सेवा म्हणून गणली जाणार नाही ?

(1) निलंबन
(2) वैद्यकीय कारणाशिवाय असलेली असाधारण रजा
(3) सक्तीचा प्रतीक्षाधीन कालावधी
(4) परिवीक्षाधीन कालावधी

---

56. खालीलपैकी कोणते विधान **चूक** आहे ?

(a) आहरण व संवितरण अधिकाऱ्याने, राजपत्रित अधिकाऱ्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र पहिल्या वेतनदेयकासोबत जोडावे.

(b) सहा महिन्याच्या आत कार्यमुक्त केलेल्या कर्मचाऱ्याच्या सेवा, फेरनेमणुकीच्या सहा महिन्यानंतर वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय पुढे सुरू ठेवता येणार नाहीत.

(c) पदोन्नतीच्या/समान दर्जाच्या पदावर नियुक्ती झाल्यास वैद्यकीय तपासणीची आवश्यकता नाही.

(d) सहा महिन्यांचा तात्पुरत्या सेवेचा कालावधी संपल्यानंतर, वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय, त्या कर्मचाऱ्याची फेरनेमणूक करता येणार नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील (a) व (b)
(2) वरील (b), (c), (d)
(3) वरील (d)
(4) वरील (a)

---

57. "परिवीक्षाधीन" बाबत गैरलागू विधान ओळखा :

(1) परिवीक्षाधीन म्हणजे एखाद्या विभागाच्या संवर्गातील कायम अथवा अस्थायी रिक्त पदावर परिवीक्षाधीन म्हणून नेमलेला शासकीय कर्मचारी.

(2) एखाद्या संवर्गातील स्थायी पदावर कायमपणे नियुक्त केलेली व्यक्ती परिवीक्षाधीन असणार नाही.

(3) परिवीक्षाधीन बाबत निश्चित शर्ती नियुक्तिच्या वेळी लागू करणे आवश्यक आहे.

(4) परिवीक्षाधीन व्यक्तीचा दर्जा, कायम दर्जा असल्याप्रमाणे मानण्यात येणार नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

58. एखाद्या पदावर धारणाधिकार संपादित होण्यासाठी खालीलपैकी कोणती बाब पुरेशी आहे ?
(1) नियमित सेवेची 12 वर्षे पूर्ण झालेली असावीत
(2) पद कायम हवे व नियुक्ती स्थायी हवी
(3) नियमित सेवेची 3 वर्षे पूर्ण झालेली असावीत
(4) पद स्थायी हवे व नियुक्ती कायम हवी

---

59. खालीलपैकी कोणत्या बाबीची नोंद सेवापुस्तकात घेतली जाणार नाही ?
(1) निलंबन कालावधी
(2) विभागीय चौकशीबाबतचे ज्ञापन
(3) बजावलेली शिक्षा
(4) बडतर्फीचे आदेश

---

60. खालीलपैकी कोणता कालावधी सक्तीचा प्रतीक्षाधीन कालावधी गणला जाणार नाही ?
(1) पदनियुक्तिचे आदेश मिळेपर्यंतचा कालावधी
(2) धारण केलेले पद रद्द झाल्यावर नवीन आदेशाचा कालावधी
(3) कार्यमुक्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याकडून पदभार घेणे शक्य होत नसलेला कालावधी
(4) पदग्रहण अवधीपेक्षा उपभोगलेला अधिकचा कालावधी

---

61. धारणाधिकार निलंबनाबाबत, खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?
(a) भूतलक्षी प्रभावाने धारणाधिकाराचे निलंबन अनुज्ञेय असते.
(b) शासकीय कर्मचाऱ्याने संवर्गाबाहेरील स्थायी पदावर धारणाधिकार संपादित केला, तर त्याचा मूळ पदावरील धारणाधिकार समाप्त होईल.
(c) धारणाधिकार दुसऱ्या स्थायी पदाकडे बदली केला जाऊ शकतो.
(d) सावधी नियुक्ती पदावरील शासकीय कर्मचाऱ्याचा धारणाधिकार कोणत्याही परिस्थितीत निलंबित करता येणार नाही.

**पर्यायी उत्तरे :**
(1) वरील (a) व (b)
(2) वरील (a) व (d)
(3) वरील (b) व (c)
(4) वरील सर्व विधाने बरोबर आहेत

---

62. कमी वेतन पदावरील बदली केव्हा अनुज्ञेय आहे ?
(a) विभागीय चौकशी दरम्यान
(b) निलंबन कालावधीमध्ये
(c) लेखी विनंती
(d) वैद्यकीय प्रमाणपत्र

**पर्यायी उत्तरे :**
(1) वरील (a) व (c)
(2) वरील (a) व (d)
(3) वरील (a), (c), (d)
(4) वरील (c) व (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

63. खालीलपैकी कोणते विधान बरोबर **नाही** ?

(1) शारीरिक पात्रता प्रमाणपत्र सादर करण्याची जास्तीत जास्त कालमर्यादा नियुक्तिच्या तारखेपासून सहा महिने एवढी आहे.

(2) वैद्यकीय तपासणीचे नियम महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम, 1961 मध्ये समाविष्ट आहेत.

(3) अपवादात्मक परिस्थितीत अगोदर वैद्यकीय प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय नियुक्ती करता येते.

(4) कायम नियुक्तिसाठी शारीरिक पात्रता प्रमाणपत्राची आवश्यकता असते.

---

64. शासकीय कर्मचाऱ्यास शासन सेवेसाठी किती वेळ काम करण्यासाठी आदेश देता येतात ?

(1) कार्यालयीन वेळेच्या मर्यादेत

(2) कार्यालय प्रमुखास आवश्यक वाटेल त्या कालावधीपर्यंत

(3) 12 तासांपेक्षा जास्त नाही

(4) संपूर्ण वेळ

---

65. शासकीय सेवेच्या प्रयोजनार्थ 'दिवस' म्हणजे खालीलपैकी कोणता कालावधी होय ?

(1) भारतीय प्रमाणवेळेनुसार मोजलेला 24 तासांचा कोणताही सलग कालावधी.

(2) एका मध्यरात्रीपासून सुरू होणारा व दुसऱ्या मध्यरात्री संपणारा कालावधी.

(3) विहित करण्यात आलेली कार्यालयीन कामकाजाची वेळ.

(4) एका मध्यान्हापासून सुरू होणारा व दुसऱ्या मध्यान्ही संपणारा कालावधी.

---

66. खालील विधानांचा विचार करा :

(a) शासकीय कर्मचाऱ्याचा एकाच वेळेस दोन पदांवर धारणाधिकार राहू शकतो.

(b) शासकीय कर्मचाऱ्याने एका पदावर धारणाधिकार प्राप्त केल्यावर त्याचा अन्य पदावरील धारणाधिकार संपुष्टात येतो.

यापैकी कोणते विधान **योग्य** आहे ?

(1) (a) विधान चूक व (b) विधान बरोबर आहे.

(2) (a) व (b) दोन्ही विधाने बरोबर आहेत.

(3) (a) व (b) दोन्ही विधाने चूक आहेत.

(4) (a) विधान बरोबर व (b) विधान चूक आहे.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

67. शासकीय सेवेकरिता पात्रता विषयक वैद्यकीय प्रमाणपत्रामध्ये खालीलपैकी कोणती बाब समाविष्ट असते ?

(a) उमेदवाराच्या डाव्या हाताचा अंगठा

(b) ओळख चिन्हे

(c) नियुक्तिचा विभाग

(d) देवी काढल्या आहेत किंवा नाहीत

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील (a) व (b)

(2) वरील (a), (b) व (c)

(3) वरील (b), (c) व (d)

(4) वरील सर्व

---

68. सेवापुस्तक/सेवापटांच्या वार्षिक पडताळणीबाबत, खालीलपैकी कोणते विधान चूक आहे ?

(1) सेवापुस्तके/सेवापट यात घेण्यात आलेल्या नोंदींची इतर अभिलेखावरून खात्री करून घ्यावी.

(2) वेतनदेयके किंवा वेतनपट यासारखे अभिलेख ग्राह्य धरण्यात येऊ नयेत.

(3) पडताळणी केल्याची नोंद कार्यालय प्रमुखाने सेवापुस्तक/सेवापटात घ्यावी.

(4) पडताळणी प्रत्येक वर्षी 'मे' महिन्यात करावी.

---

69. खालीलपैकी कोणत्या परिस्थितीत धारणाधिकाराचे निलंबन होईल ?

(1) निलंबनाधीन असताना

(2) स्वीयेत्तर सेवेत असताना

(3) सावधि-नियुक्ती पदावर कायम नात्याने नियुक्ती झाल्यास

(4) मंजूर केलेल्या कोणत्याही रजेवर असताना

---

70. खालील विधानांचा विचार करा :

(a) शासकीय कर्मचाऱ्यांना नियुक्तिपूर्वी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक आहे.

(b) अंशकालीक कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक नाही.

यापैकी कोणते विधान **योग्य** आहे ?

(1) दोन्ही विधाने चूक आहेत.

(2) (a) विधान बरोबर आहे व (b) विधान चूक आहे.

(3) (a) विधान चूक आहे व (b) विधान बरोबर आहे.

(4) दोन्ही विधाने बरोबर आहेत.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

71. कर्तव्यामध्ये पुढीलपैकी कोणती बाब समाविष्ट आहे ?

(a) प्रशिक्षण पाठ्यक्रम

(b) अभ्यास मंडळीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी व्यतीत केलेला कालावधी

(c) बालवीर शिबीरातील प्रशिक्षण कालावधी

(d) निलंबन कालावधी

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील (a) व (b) (2) वरील (a), (b), (c)

(3) वरील (c) व (d) (4) वरील सर्व

---

72. 'स्थायी' पद म्हणजे –

(1) निश्चित वेतन दर असलेले, कालमर्यादा न घालता मंजूर केलेले व कधीही नष्ट न होणारे पद.

(2) ज्या पदावरील नियुक्तिनंतर बदली करता येत नाही असे स्थिर पद.

(3) कालमर्यादा न घालता मंजूर केलेले, निश्चित वेतन दर असलेले पद.

(4) विशिष्ट कार्यालयातच अस्तित्वात असते असे एकमेव पद.

---

73. जन्मतारखेमध्ये फेरबदल करण्यासाठी, खालीलपैकी कोणता पुरावा, पुरेसा पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात येऊ नये ?

(1) विद्यापीठाचे प्रमाणपत्र (2) नामसंस्कार नोंदवहीतील उतारा

(3) खातेवह्यांमधील नोंद (4) जन्मपत्रिका

---

74. शासकीय सेवेसाठी असमर्थ ठरविलेल्या व्यक्तिला पुनर्नियुक्त करण्यासाठी खालीलपैकी कोणती गोष्ट आवश्यक आहे ?

(1) कार्यालय प्रमुखांची विनंती (2) वैद्यकीय समितीचे प्रमाणपत्र

(3) वैद्यकीय विशेषज्ञाचे प्रमाणपत्र (4) वैद्यकीय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र

---

75. विशेष वेतन म्हणजे –

(a) विशेष जिकरीच्या स्वरूपाच्या कर्तव्याकरिता दिलेले वेतन.

(b) जबाबदारीत विशिष्ट वाढीस्तव दिलेले वेतन

(c) धारण केलेल्या पदाकरिता मंजूर वेतन

(d) वैयक्तिक वेतन

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील (a) व (b) (2) वरील (a), (b), (c) (3) वरील (b) व (d) (4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग - ब

76. टिप्पणीलेखनाबाबतच्या पुढील विधानांपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?

(a) विचाराधीन असलेल्या कागदपत्रातील सर्वच मुद्दयांचा टिप्पणीत समावेश होणे आवश्यक असल्याने विचाराधीन कागदपत्रातील उतारे जसेच्या तसे टिप्पणीत उद्धृत करणे आवश्यक आहे.

(b) अर्धा समास सोडून लिहिलेली एका पृष्ठापेक्षा अधिक दीर्घ नसलेली टिप्पणी टंकलिखित करण्याची आवश्यकता नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक

---

77. पुढीलपैकी **अयोग्य** विधान ओळखा -

(a) तारांकित प्रश्नावर विधीमंडळ सदस्याला पुरवणी प्रश्न विचारता येतात.

(b) अतारांकित प्रश्नावर विधीमंडळ सदस्याला पुरवणी प्रश्न विचारता येतात.

(c) अतारांकित प्रश्नाचे उत्तर लेखी दिले जाते.

(d) तारांकित प्रश्नावर विधिमंडळ सदस्याला पुरवणी प्रश्न विचारता येत नाहीत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (d) (2) (a) व (b) (3) (a) व (c) (4) (b) व (d)

---

78. कार्यालयीन कार्यपद्धती नियम पुस्तिकेनुसार नित्याच्या स्वरूपाच्या कागदपत्रांमध्ये पुढीलपैकी कोणत्या पत्रांचा समावेश होतो ?

(a) शासन निर्णय (b) शासन अधिसूचना

(c) शाखेबाहेर पाठवायची पत्रे (d) मुलाखती निश्चित करणारी पत्रे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) (2) फक्त (b), (c) आणि (d)

(3) फक्त (c) आणि (d) (4) फक्त (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

79. तातडीची प्रकरणे किती दिवसाच्या आत प्रस्तुत करावयाची असतात ?

(1) एक (2) दोन (3) चार (4) सात

80. 'निवड फाईल्स'च्या संदर्भात पुढील विधाने लक्षात घेऊन अचूक पर्याय निवडा.

(a) शाखेतून निर्गमित केल्या जाणाऱ्या प्रत्येक महत्वाच्या आदेशाची किंवा पत्राची एक प्रत 'निवड फाईल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या स्वतंत्र फाईलमध्ये ठेवण्यात येते.

(b) प्रकरणासोबत प्रस्तुत करण्यासाठी जेव्हा एखादे महत्वाचे पत्र किंवा आदेश आवश्यक असते तेव्हा निवड फाईलमध्ये ठेवण्यात आलेली त्याची प्रत काढून त्वरित प्रकरणासोबत सादर करणे शक्य व्हावे हा निवड फाईल ठेवण्याचा मुख्य उद्देश असतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर (b) चूक

(2) (a) व (b) दोन्ही बरोबर आणि (b) हे (a) चे योग्य स्पष्टीकरण आहे

(3) (a) व (b) दोन्ही बरोबर परंतु (b) हे (a) चे स्पष्टीकरण नाही

(4) (a) चूक (b) बरोबर

81. कार्यालयीन कार्यपद्धती नियमपुस्तिकेनुसार इतर विभागांना पाठविण्यात येणारे अनौपचारिक संदर्भ चिन्हांकित करण्याबाबत खालीलपैकी योग्य पर्याय निवडा :

(1) अनौपचारिक संदर्भ सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागांना पाठविताना त्या विषयावर कार्यवाही करणाऱ्या प्रभारी अवर सचिवांना थेट चिन्हांकित करण्यात यावेत.

(2) अनौपचारिक संदर्भ विधी व न्याय विभाग आणि वित्त विभाग या व्यतिरिक्त अन्य विभागांना पाठविताना त्या विषयवार कार्यवाही करणाऱ्या त्या विभागाच्या प्रभारी अवर सचिवांना थेट चिन्हांकित करण्यात यावेत.

(3) अनौपचारिक संदर्भ वित्त विभाग आणि नियोजन विभागांना पाठविताना त्या विषयावर कार्यवाही करणाऱ्या प्रभारी अवर सचिवांना थेट चिन्हांकित करण्यात यावेत.

(4) अनौपचारिक संदर्भ सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, नियोजन विभाग आणि विधी व न्याय विभागांना पाठविताना त्या विभागाच्या प्रभारी सचिवांना थेट चिन्हांकित करण्यात यावेत.

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**82.** साधारण राजपत्र प्रत्येक ________ वारी प्रसिद्ध करण्यात येते.

(1) सोमवार (2) मंगळवार (3) गुरुवार (4) रविवार

---

**83.** एखाद्या नस्तीमधील विषयावरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ती फाईल बंद करण्याच्या कार्यपद्धतीला काय म्हणतात ?

(1) निंहणीकरण (2) वर्गीकरण (3) अभिलेखन (4) सुलेखन

---

**84.** अनिश्चित काळापर्यंत जतन करावयाच्या फाईलींचा वर्ग कोणता ?

(1) अ - वर्ग (2) ब - वर्ग (3) क - वर्ग (4) ड - वर्ग

---

**85.** अधिकाऱ्याने चर्चेसाठी कार्यालयाकडे पाठविलेली प्रकरणे किती तासांच्या आत चर्चेसाठी घेण्यात यावीत ?

(1) 8 तास (2) 12 तास (3) 6 तास (4) 24 तास

---

**86.** गतिमान प्रशासनाद्वारे नागरिकांना तत्पर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या 'आपले सरकार' या पोर्टलवर पुढीलपैकी कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत ?

(a) सेवा हमी कायद्यांतर्गत उपलब्ध सेवा (b) तक्रार निवारण

(c) माहितीचा अधिकार (d) योजनांची माहिती देणारी महायोजना सुविधा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (d) (2) फक्त (a), (b) व (d)

(3) फक्त (a) व (c) (4) उपरोक्त सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

87. माहिती अधिकार अधिनियमाच्या उद्दिष्टासंदर्भात पुढीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

(a) राज्य कारभारात पारदर्शकता व खुलेपणा निर्माण करणे.

(b) नागरिकांचा शासनकारभारातील हस्तक्षेप वाढविणे.

(c) संपूर्णत: भ्रष्टाचारमुक्त राज्य निर्माण करणे.

(d) व्यापक लोकहिताचे उद्दिष्ट साध्य करणे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a), (b) आणि (c)
(2) फक्त (a), (c) आणि (d)
(3) फक्त (a) आणि (d)
(4) सर्व विधाने योग्य आहेत

---

88. केंद्र शासनाने नेमलेल्या दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाचे अध्यक्ष कोण होते ?

(1) श्री. प्रणव मुखर्जी
(2) श्री. विरप्पा मोईली
(3) श्री. शरद पवार
(4) श्री. व्यंकय्या नायडू

---

89. मंत्रालयातील नस्ती क्रमांक देण्याचे काम विकेंद्रीत करून कामाला गती आणण्यासाठी मॅक्सवेल पद्धत बंद करून सुरू करण्यात आलेल्या 'त्रिअक्षरी क्रमांक पद्धतीबाबत' पुढीलपैकी कोणती विधाने योग्य आहेत ?

(a) या पद्धतीत नस्ती क्रमांक पाहून विषय, उपविषय, नस्तीच्या सुरवातीचे वर्ष, केस क्रमांक व कार्यासन हे सर्व लक्षात येते.

(b) या पद्धतीने जर 'रोह्यो 1905/प्र. क्र. 40/रोह - 4' असा नस्ती क्रमांक देण्यात आलेला असेल तर 1905 ही संख्या नस्ती सुरू केल्याचे वर्ष 1905 आहे हे सूचित करते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a)
(2) फक्त (b)
(3) दोन्ही बरोबर
(4) दोन्ही चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

90. मंत्रालयातील टिप्पणी लेखन व पत्रव्यवहार नियमावलीनुसार शासन पत्रव्यवहाराच्या प्रकारांपैकी पुढीलपैकी कोणते पत्रव्यवहार राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने करण्यात येतात ?

(a) शासन निर्णय
(b) ज्ञापन
(c) कार्यालयीन आदेश
(d) अधिसूचना

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) आणि (c)
(2) (a), (b) आणि (d)
(3) (a) आणि (b)
(4) वरील सर्व

---

91. तारांकित प्रश्नाच्या संदर्भात खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(a) सभागृहामध्ये पुरक प्रश्न विचारता येतात.
(b) तीस पूर्ण दिवसाची नोटीस द्यावी लागते.
(c) उत्तराचा दिनांक विहित केलेला असतो.
(d) उत्तराच्या प्रती प्रसिद्धिसाठी क्षेत्रीय कार्यालयांना पाठविल्या जातात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व
(2) (a) व (b)
(3) (c)
(4) (d)

---

92. महाराष्ट्र विधानसभा नियम 101 अन्वये उपस्थित करण्यात येणाऱ्या अल्पवेळ चर्चेसंदर्भात पुढीलपैकी कोणती विधाने **अयोग्य** आहेत ?

(a) सदर चर्चा उपस्थित करण्यासाठी सादर करण्यात येणाऱ्या नोटिशीला, चर्चा उपस्थित करण्यासंबंधीची कारणे नमूद करणारी स्पष्टीकरणात्मक टिपणी जोडणे आवश्यक आहे.
(b) नोटिशीच्या पृष्ट्यर्थ किमान तीन सदस्यांनी त्यावर सही करणे आवश्यक आहे.
(c) ज्या सदस्याने अध्यक्षांना पूर्वसूचना दिली असेल त्या सदस्याव्यतिरिक्त इतर सदस्यही अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेत भाग घेऊ शकतात.
(d) परिस्थितीनुसार अध्यक्ष जास्तीत जास्त अर्धा तास चर्चेसाठी वेळ ठरवून देऊ शकतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (c)
(2) फक्त (a) आणि (d)
(3) फक्त (a), (b) आणि (d)
(4) फक्त (b) आणि (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

93. (a) दर मंगळवारी आणि गुरुवारी त्या दिवसाच्या विधानसभेच्या बैठकीच्या शेवटी पुरेशा सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी अध्यक्ष अर्धा तास नेमून देतील.

(b) अध्यक्षास मंगळवार आणि गुरुवार याऐवजी इतर कोणतेही दिवस अशा चर्चेकरिता नेमून देता येतील.

उपरोक्त विधानांपैकी कोणते विधान अर्धा-तास चर्चेबाबत योग्य आहे ?

(1) दोन्ही बरोबर (2) दोन्ही चूक

(3) (a) बरोबर (b) चूक (4) (a) चूक (b) बरोबर

---

94. अर्धा तास चर्चेसंदर्भात पुढीलपैकी कोणती विधाने **योग्य** आहेत ?

(a) महाराष्ट्र विधानपरिषद नियम 92 अन्वये विधानपरिषद सदस्य एखाद्या सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर अर्धा तास चर्चा उपस्थित करू शकतात.

(b) चर्चेकरिता विधानपरिषद सदस्याकडून मांडण्यात आलेली बाब पुरेशी सार्वजनिक महत्वाची आहे किंवा कसे हे ठरविण्याचा अधिकार विधानसभा अध्यक्षांना आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b)

(3) दोन्ही (a) व (b) योग्य (4) दोन्ही (a) व (b) अयोग्य

---

95. (a) महाधिवक्ता (ॲडव्होकेट जनरल) यांनी दिलेल्या ठरावांना नियम 106 मधील तरतूदी लागू नाहीत.

(b) अशा ठरावांच्या बाबतीत 7 दिवसांची नोटीस देणे आवश्यक असते.

अशासकीय सदस्यांनी दिलेल्या ठरावासंदर्भात उपरोक्त नमूद बाबींपैकी कोणती बाब बरोबर आहे ?

(1) (a) व (b) (2) फक्त (a) (3) फक्त (b) (4) यापैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

96. राज्य विधिमंडळाच्या एका सभागृहाच्या कार्यपद्धतीचे नियम करण्याचा अधिकार खालीलपैकी कोणास आहे?

(1) राज्यपाल
(2) राज्यपालांच्या अनुमतीने मुख्यमंत्र्यास
(3) त्या सभागृहास
(4) विधिमंडळ सचिवालयास

---

97. विधानसभेच्या बैठकीत अध्यक्षास पदावरून दूर करण्याचा ठराव मांडण्यासाठी किमान किती दिवसांची नोटीस आवश्यक आहे?

(1) सात
(2) दहा
(3) शासकीय कामकाजाची पाच दिवस
(4) चौदा

---

98. अनुच्छेद __________ अन्वये राज्याच्या विधानसभेचा किंवा विधानपरिषदेचा सदस्य, पदग्रहण करण्यापूर्वी शपथ घेतो.

(1) 288 (2) 188 (3) 270 (4) 170

---

99. अनुच्छेद __________ नुसार राज्य शासनाचा कारभार राज्यपालांच्या नावाने करण्यात येतो.

(1) 162 (2) 168 (3) 166 (4) 165

---

100. भारतीय राज्यघटना अनुच्छेद 333 च्या तरतूदी विचारात घेता, प्रत्येक राज्याची विधानसभा राज्यातील क्षेत्रीय मतदार संघातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे एकूण किती सदस्यांची बनलेली असते?

(1) कमीत कमी 60 व जास्तीत जास्त 500
(2) कमीत कमी 79 व जास्तीत जास्त 288
(3) कमीत कमी 60 व जास्तीत जास्त 288
(4) यापैकी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## विभाग - क

76. राज्य शासनाच्या सेवेमध्ये खालीलपैकी किमान किती वर्षे सेवा झालेल्या व्यक्तिची लोकसेवा आयोगाचे सदस्य म्हणून नियुक्ती होऊ शकते ?

(1) किमान 20 वर्षे (2) किमान सेवेची अट नाही
(3) किमान 10 वर्षे (4) किमान 15 वर्षे

---

77. मागासवर्गीयांच्या आरक्षणांसंदर्भात लोकसेवा आयोगाचा सल्ला घेण्याबाबत संविधानामध्ये खालीलपैकी कोणती तरतूद आहे ?

(1) नवीन आरक्षण लागू करताना अथवा आरक्षणाची टक्केवारी विहित करताना लोकसेवा आयोगाचा सल्ला घेणे शासनावर बंधनकारक आहे.
(2) आरक्षणासंदर्भातील कोणत्याही बाबींवर लोकसेवा आयोगाशी सल्ला मसलत करणे आवश्यक नाही.
(3) नवीन आरक्षण तयार करताना आयोगाच्या मान्यतेची आवश्यकता आहे.
(4) आरक्षणाची टक्केवारी बदलताना आयोगाच्या मान्यतेची आवश्यकता आहे.

---

78. संविधानाच्या खालीलपैकी कोणत्या अनुच्छेदानुसार राज्य लोकसेवा आयोगाचा अध्यक्ष भारत सरकार किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या नोकरीस पात्र असणार नाही ?

(1) अनुच्छेद 316 (2) अनुच्छेद 320 (3) (ख)
(3) अनुच्छेद 317 (4) अनुच्छेद 319 (ख)

---

79. राज्य लोकसेवा आयोगाची कार्ये विस्तारण्याचे अधिकार खालीलपैकी कोणास आहेत ?

(1) राज्यपाल (2) राष्ट्रपती (3) राज्य विधानमंडळ (4) मुख्यमंत्री

---

80. लोकसेवा आयोगाच्या सदस्यास निलंबित करण्याचे अधिकार खालीलपैकी कोणास आहेत ?

(1) मा. राज्यपाल (2) मा. राष्ट्रपती
(3) मा. मुख्यमंत्री (4) आयोगाचे मा. अध्यक्ष

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

81. लोकसेवा आयोगाच्या कर्मचारी वर्गाच्या सदस्यांची संख्या आणि त्यांच्या सेवाशर्ती नियम याबाबतचे उपबंध खालीलपैकी कशाच्या आधारे विहित करण्यात येतात ?

(1) शासन निर्णय
(2) आयोगाची कार्यनियमावली
(3) संविधानाच्या अनुच्छेद 320 अन्वये
(4) संविधानाच्या अनुच्छेद 318 अन्वये

---

82. संविधानाच्या अनुच्छेद 320 (3) च्या परंतुकाखाली राज्याच्या राज्यपालांनी केलेले सर्व विनियम ते केल्यानंतर राज्य विधानमंडळाच्या सभागृहासमोर कमीत कमी किती दिवसापर्यंत ठेवणे आवश्यक आहे ?

(1) कमीत कमी सात दिवस
(2) कमीत कमी एकवीस दिवस
(3) कमीत कमी चौदा दिवस
(4) कोणतीही मर्यादा नाही

---

83. आयोगाद्वारे सरळसेवेने भरण्यात येणाऱ्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांतर्गत येणाऱ्या फक्त शिक्षकीय पदांकरिता प्रतीक्षा यादीचा कालावधी खालीलपैकी कोणता आहे ?

(1) निकालाच्या दिनांकापासून एक वर्षे किंवा पुढील भरतीच्या निकालाच्या दिनांकापर्यंत
(2) सदर पदाकरिता प्रतीक्षायादी ठेवली जात नाही
(3) निकालाच्या दिनांकापासून एक वर्षे किंवा पुढील भरतीच्या जाहिरातीच्या दिनांकापर्यंत
(4) निकालाच्या दिनांकापासून पुढील दोन वर्षापर्यंत अथवा नवीन निवड प्रक्रियेच्या निकालाच्या दिनांकापर्यंत

---

84. नियुक्तिच्या दिनांकास कायमपणे शासकीय सेवेत नसलेल्या सदस्याला खालीलप्रमाणे असाधारण रजा मंजूर करता येते –

(1) कोणतीही मर्यादा नाही
(2) आयोगाच्या अध्यक्षांच्या स्वेच्छाधिकारानुसार
(3) कोणत्याही एकावेळी कमाल 90 दिवसांच्या मर्यादेस अधीन राहून भत्ते न देता
(4) कोणत्याही एकावेळी कमाल 90 दिवसांच्या मर्यादेस अधीन राहून भत्त्यासह

---

85. आयोगाच्या सदस्यांच्या नियुक्तिच्या बाबतीत खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) सदस्य पदावरील कालावधी संपुष्टात आल्यानंतर शासकीय सेवेत जाता येते.
(2) सदस्य पदावरील निवृत्तीनंतर शासकीय सेवेत पुनर्नियुक्ती होऊ शकते.
(3) सदस्याच्या नियुक्तिच्या वेळी शासकीय सेवेत असेल तर तो सदस्य म्हणून नियुक्तिच्या दिनांकापासून शासकीय सेवेतून निवृत्त झाल्याचे समजण्यात येते.
(4) सदस्य म्हणून नियुक्तिच्या दिनांकापासून शासकीय सेवेतून निवृत्त झाल्याचे समजण्यात येत नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

86. आयोगाच्या सचिवांचा कालावधी वाढविण्याचे अधिकार खालीलपैकी कोणाला आहेत ?

(1) अध्यक्ष (2) मुख्यमंत्री (3) राज्यपाल (4) संपूर्ण आयोग

---

87. कार्यालयीन कामकाजामध्ये वित्तीय नियमावलीचे पालन करण्याबाबतची तरतूद खालीलपैकी कोणत्या स्थायी आदेशाद्वारे करण्यात आली आहे ?

(1) दिनांक 31 मार्च, 2012 (2) दिनांक 28 जून, 2011

(3) दिनांक 25 मार्च, 2013 (4) दिनांक 11 ऑगस्ट, 2009

---

88. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील गट अ च्या अधिकाऱ्यांचे शिस्तभंग विषयक प्रकरणासंदर्भात अपील प्राधिकारी खालीलपैकी कोण आहेत ?

(1) अध्यक्ष (2) राज्यपाल (3) मुख्य सचिव (4) संपूर्ण आयोग

---

89. पोलीस उप निरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा किती ठिकाणी घेण्यात येते ?

(1) चार (2) सदोतीस (37) (3) सात (4) सहा

---

90. मा. राज्यपालांच्या 'मान्यतेविना' आयोगाच्या कार्यालयातील राजवटीत अधिकाऱ्यांची नेमणूक किती कालावधीकरिता करण्याचे प्राधिकार आयोगाच्या मा. अध्यक्षांना प्रदान करण्यात आले आहेत ?

(1) तीन महिने (2) तीन वर्षे (3) 11 महिने (4) एक वर्षे

---

91. आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांची नियुक्ती खालीलपैकी किती कालावधीत करणे आवश्यक आहे ?

(1) शिफारशीच्या दिनांकापासून तीन महिने (2) शिफारशीच्या दिनांकापासून एक महिना

(3) शिफारशीच्या दिनांकापासून दोन महिने (4) शिफारशीच्या दिनांकापासून सहा महिने

---

92. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग) (मुख्य) लेखीपरीक्षेद्वारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त होण्यासाठी अमागास उमेदवाराने लेखी परीक्षेच्या प्रत्येक विषयात किमान किती टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे ?

(1) 40% (2) 45% (3) 50% (4) 55%

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

93. निवडप्रक्रियेतील गैरप्रकार प्रकरणी संबंधितांना प्रतिरोधित करण्यासाठी खालीलपैकी कोणाच्या मान्यतेची आवश्यकता असते ?

(1) अध्यक्ष (2) सचिव (3) संपूर्ण आयोग (4) उपसचिव

---

94. आयोगातर्फे ज्या पदांकरिता शारीरिक चाचणी घेतली जाते, त्या पदांच्या शारीरिक चाचणीकरिता विज्ञापीत पदांच्या किती पट उमेदवार बोलाविण्यात येतात ?

(1) 10 पट (2) 8 पट (3) 4 पट (4) 3 पट

---

95. आयोगाच्या कार्यालयाशी शासन स्तराकडून होणारा पत्रव्यवहार खालीलपैकी किमान कोणत्या दर्जाच्या अधिकाऱ्याच्या स्तरावरून होणे आवश्यक आहे ?

(1) प्रधान सचिव (2) सचिव (3) अवर सचिव (4) उपसचिव

---

96. प्राविण्यप्राप्त खेळाडूंचे आरक्षण खालीलपैकी कोणत्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आले आहे ?

(1) शासन निर्णय, दिनांक 30 एप्रिल, 2005 (2) शासन निर्णय, दिनांक 18 ऑक्टोबर, 1997

(3) शासन निर्णय, दिनांक 1 जुलै, 2016 (4) शासन निर्णय, दिनांक 28 मे, 2001

---

97. खालीलपैकी कोणत्या शासन आदेशाद्वारे आयोगाने मागविलेली माहिती तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत आदेश जारी करण्यात आले आहेत ?

(1) शासन परिपत्रक दिनांक 30 डिसेंबर, 1993

(2) शासन परिपत्रक दिनांक 15 जून, 1995

(3) शासन परिपत्रक दिनांक 25 सप्टेंबर, 1970

(4) शासन परिपत्रक दिनांक 19 ऑगस्ट, 1981

---

98. आयोगातर्फे घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षान्वये शासन सेवेतील प्रवेशासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा किती वर्षे विहित करण्यात आली आहे ?

(1) 30 (2) 33 (3) 38 (4) 43

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

99. दिनांक 10 मे, 2017 रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन कर सहायक पदाकरिता उच्चतम वयोमर्यादेची गणना कोणत्या दिनांकास करण्यात येईल ?

(1) दिनांक 1 सप्टेंबर, 2017 (2) दिनांक 1 जुलै, 2017

(3) दिनांक 1 ऑगस्ट, 2017 (4) दिनांक 1 एप्रिल, 2018

---

100. विकलांग उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबींसंदर्भात सुविधा खालीलपैकी कोणास अनुज्ञेय आहेत ?

(1) फक्त दृष्टिहीन व अल्पदृष्टी

(2) फक्त दृष्टिहीन, अल्पदृष्टी, सेरेब्रल पाल्सी, अस्थिव्यंग आणि डिस्लेक्सियाने बाधित

(3) फक्त दृष्टिहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी, कर्णबधिर आणि डिस्लेक्सियाने बाधित

(4) वरीलपैकी सर्वांना लागू

---

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK**

SEAL

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial